**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**४१२, ई बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.**
Web:www dhepune.gov.in Mail: vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७ २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्रमांक - उशिसं/शिष्यवृत्ती/मु.मो.शि/E- 971006 दिनांक - /०६/२०२५

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय - राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचा ५० टक्केऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठीच्या शासन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत.**

**संदर्भ** - १. शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.८/७/२०२४.
२. शासन परिपत्रक क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४, दि. १९/०७/२०२४.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, शासन निर्णय दिनांक ०८/०७/२०२४ अन्वये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग (SEBC) तसेच, इतर मागास वर्ग (OBC)या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करण्यात आलेले आहे. याबाबत आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय, शासन अनुदानित अशासकीय महाविदयालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविदयालये यांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे असे संचालनालयाद्वारे वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

विद्यार्थीनींकडून प्रवेशाचे वेळी शिक्षण शुल्काची रक्कम शैक्षणिक संस्थांनी न घेणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. संबंधीत महाविद्यालय /संस्था यांनी जर विद्यार्थिनींकडून शिक्षण शुल्काचा भरणा करून घेतला असल्यास सदर रक्कम विदयार्थ्यांना त्वरीत परत करण्यात यावी. तसेच याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांचे विरुध्द विभागीय सहसंचालकांनी व कुलसचिवांनी कडक कारवाई करावी.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये शासन निर्णय दिनांक ०८/०७/२०२४ च्या प्रभावी अंमलबजावणी करीता मुलींना मोफत व्यावसायीक शिक्षण योजना सर्व स्तरावरील विदयार्थिनींपर्यंत पोहोचेल यासाठी अर्ज करणेसाठी खालील बाबींचे मार्गदर्शन विदयार्थीनींना करावे.

१. विदयार्थीनींना शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज भरतांना साधारणता उत्पन्न प्रमाणपत्र महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र, जातिचा दाखला इ. कागदपत्रे आवश्यक असतात.
२. शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकाचा वापर करून अर्ज भरता येतो. विदयार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होणेसाठी त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्नित करणे आवश्यक आहे.
३. शिष्यवृत्तीचे शासन निर्णय, अटी-शर्ती, देय लाभ यांचे अवलोकन करून विदयार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.

४. विदयार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरतांना विचारण्यात आलेली माहिती पुर्णपणे अचूक भरून ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविदयालयांकडे पुढील कार्यवाही करीता सादर करावी.

५. ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचणी निर्माण झल्यास आपल्या महाविदयालय/संस्थेच्या मदतीने पुर्ण करून घेण्यात यावेत.

**महाविदयालयांनी करावयाची मदत / मार्गदर्शन**

१. शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेसाठी महाविद्यालयांनी संगणक, प्रिंटर,इंटरनेट इत्यादी सेवा नि:शूल्क उपलब्ध करुन द्यावे.

२. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे (उत्पन्नदाखला, रहिवासी दाखला इ.) त्वरीत प्राप्त होणेसाठी तहसिलदार/उपविभागीय कार्यालयांमार्फत महाविद्यालयात शिबिर आयोजित करण्यात यावेत.

३. महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती निहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी पोर्टलवर अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली ( अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार (अनुदानित/ विनाअनुदानित) अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती (Admission Details) टक्केवारी, शिष्यवृत्तीलाभ इ. काळजीपूर्वक पडताळणी करणेआवश्यकआहे.)

४. महाविद्यालयाच्या लिपिकांनी त्यांचे लॉगीनवर आलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही ( Approve / Reject / Sent Back) करावी. महाविद्यालयाच्या लिपिकांनी मंजूर ( Approve) केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनवर पाठवावे.

५. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपिकांप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची पडताळणी करुन सदर अर्जावर तातडीने ( Approved / Reject / send Back) कार्यवाही करावी.

६. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होताच शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घेऊन पात्र अर्ज तसेच महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज संबधीत विभागाकडे विहीत कालमर्यादेत सादर करावीत.

७. विद्यार्थीनींना शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे समाधान महाविद्यालयातील शिष्यवृत्ती नोडल अधिकारी यांनी तात्काळ करावे.

तसेच संबधित विभागीय सहसंचालकांनी शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज, आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत अपलोड असणारे व ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम बरोबर दर्शविली आहे अशाच विद्यार्थिनींचे अर्ज संचालनालयाच्या (DHE Login) वर मंजूरीसाठी तात्काळ पाठविण्यात यावेत.

८. विद्यार्थिनींना, मुलींना मोफत शिक्षण योजनेची सविस्तर माहिती देण्यात यावी व विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त अर्ज भरुन घेण्यात यावेत. कोणतीही विद्यार्थिनी सदर शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता महाविद्यालयांनी घ्यावी.

तसेच संदर्भांकित शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झाली किंवा कसे हे संबंधीत सहसंचालकांनी महाविदयालय/ संस्थांना प्रत्यक्ष भेट देवून सदर बाबतचा संकलीत अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

तसेच मुलींना मोफत शिक्षण योजनेची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी सदर योजनेची सर्वसाधारण माहिती सर्व अधिनस्त विद्यापीठ / महाविद्यालय यांना त्यांचे संकेतस्थळ / नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावेत.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 17-06-2025 19:42:24

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक , (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे - १६.